# भुयारी मेट्रोचा पहिला टप्पा जानेवारीत प्रवाशांच्या सेवेत

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील पहिली भूमिगत मेट्रो असलेल्या मेट्रो ३ च्या पहिल्या टप्प्याचे काम जवळपास पूर्ण झाले असून जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत ही मार्गिका प्रवाशांच्या सेवेत रुजू होण्याची शक्यता आहे.

आचार्य अत्रे चौक या स्थानकाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री दीपक केसरकर यांनी भेट देत अलिकडेच या कामाचा आढावा घेतला.

मेट्रो ३ चा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ मध्ये सुरू करण्यात येणार होता. परंतु, विविध चाचण्या आणि सुरक्षा प्रमाणपत्रांच्या कामांना विलंब झाल्याने ही डेडलाईन हुकली. आता या प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरू असून जानेवारी महिन्यात ही मेट्रो प्रवाशांच्या सेवेत रुजू करण्याची तयारी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडून करण्यात येत आहे. त्यामुळे जानेवारी अखेरपर्यंत प्रकल्पाचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी सुरू होण्याची शक्यता आहे.

दक्षिण मुंबईतील कुलाबा ते पश्चिम उपनगरातील अंधेरी सीप्झदरम्यान मेट्रो ३ हा प्रकल्प राबवला जाणार आहे. या मेट्रोचे कारशेड आरे कॉलनीत उभारण्यात आले आहे.

या मार्गिकेची लांबी ३३ किमी असून त्यावर २७ स्थानके आहेत. आरे ते बीकेसी दरम्यानचे काम ९७ टक्क्यांहून अधिक पूर्ण झाले आहे. या मार्गिकेवर धावण्यासाठी ९ गाड्यासुद्धा एमएमआरसीच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत.